DAY —— **13**   SEAT NUMBER

2024 | VIII | 01   1100   **J-221**   (M)

ECONOMICS (49)

Time : 3 Hrs.   **(7 Pages)**   **Max. Marks : 80**

सूचना : *(१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*

(२) आवश्यक त्या ठिकाणी कोष्टके / आकृत्या काढा.

(३) उजव्या बाजूचे अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

(४) सर्व मुख्य प्रश्नांची उत्तरे नवीन पानांवर लिहावीत.

प्र. १. (अ) योग्य पर्याय निवडा : (५) [२०]

(i) सूक्ष्म अर्थशास्त्रीय विश्लेषणात वापरली जाणारी पद्धत.

(अ) राशी पद्धत   (ब) समग्र पद्धत

(क) विभाजन पद्धत   (ड) सर्वसमावेशक पद्धत

पर्याय: (१) अ, ब, क आणि ड   (२) ब, क, आणि ड

(३) फक्त क   (४) फक्त अ

(ii) राष्ट्रीय उत्पन्न ही एक .... संकल्पना आहे.

(अ) साठा   (ब) अंतिम

(क) मध्य   (ड) प्रवाह

पर्याय: (१) अ आणि ब   (२) फक्त ड

(३) ब आणि क   (४) अ, ब, आणि क

(iii) भारताच्या पेट्रोलियम आयातीचा स्रोत.

(अ) कुवेत (ब) सौदी अरेबिया

(क) चीन (ड) सिंगापूर

पर्याय: (१) अ आणि ब (२) क आणि ड

(३) अ, ब आणि क (४) ब, क आणि ड

(iv) सरकारच्या सक्तीच्या कार्यांमध्ये पुढील पैकी या कार्याचा समावेश होतो.

(अ) रोजगार निर्मिती

(ब) अंतर्गत कायदा व सुव्यवस्था

(क) कल्याणकारी उपाय योजना

(ड) वस्तू व सेवांची निर्यात

पर्याय: (१) अ आणि ब (२) क आणि ड

(३) अ, ब, आणि क (४) फक्त ब

(v) वित्तीय व्यवस्थेत व्यापारी बँका मध्यस्थ म्हणून काम करतात. कारण ....

(अ) नफा कमवणे

(ब) देशाच्या आर्थिक वृद्धीचा वेग वाढविणे

(क) बचती गतिमान करणे आणि उत्पादक गुंतवणुकीसाठी वाटप करणे

(ड) पतनियंत्रण करणे

पर्याय: (१) फक्त अ (२) अ आणि ब

(३) ब आणि क (४) अ, ब, क आणि ड

(ब) सहसंबंध पूर्ण करा : (५)

(i) नाणे बाजार : अल्पकालीन निधी : : ☐ : दीर्घकालीन निधी.

(ii) टेबल-खुर्ची : रूप उपयोगिता : : संगणकाची माहिती : ☐

(iii) ☐ : कापड : : अप्रत्यक्ष मागणी : कामगार

(iv) तात्त्विक अडचण : हस्तांतरित देणी : : ☐ : मालाच्या साठ्याचे मूल्यांकन

(v) सरकारी खर्च > सरकारी प्राप्ती : तुटीचे अंदाजपत्रक : : सरकारी खर्च − सरकारी प्राप्ती : ☐

(क) विसंगत शब्द ओळखा : (५)

(i) जीवनावश्यक वस्तू – अन्नधान्य, औषधे, कार, पुस्तके

(ii) निर्देशांकांचे प्रकार – भारान्वित निर्देशांक, किंमत निर्देशांक, संख्यात्मक निर्देशांक, मूल्य निर्देशांक

(iii) पायाभूत सुविधा – वाहतूक, संचार, पाणीपुरवठा, अनुदान

(iv) बँक खात्यांचे प्रकार –

बचत खाते, डीमॅट खाते, आवर्त ठेव खाते, चालू खाते

(v) उत्पादन घटकांच्या किंमतींचे तत्त्व –

नफा, व्याज, बेकारी भत्ता, खंड

(ड) खालील विधाने पूर्ण करा : (५)

(i) जेव्हा सीमांत उपयोगिता ऋण होते, तेव्हा एकूण उपयोगिता ....

(अ) वाढते (ब) स्थिर असते

(क) घटते (ड) शून्य असते

(ii) मागणी व किंमत यांचा फलनसंबंध खालील सूत्राने दर्शवू शकतो ....

(अ) $Dx = f(Px)$

(ब) $Dx = f(Pz)$

(क) $Dx = f(Y)$

(ड) $Dx = f(Tx)$

(iii) भारताच्या विदेशी व्यापाराच्या निर्यात कलातील घटक...............

(अ) पेट्रोलियम (ब) अभियांत्रिकी वस्तू

(क) सोने (ड) खते

(iv) 'य' अक्षास समांतर असलेला किंमत लवचीकतेचा मागणी वक्र..........

(अ) संपूर्ण लवचीक मागणी

(ब) संपूर्ण अलवचीक मागणी

(क) जास्त लवचीक मागणी

(ड) कमी लवचीक मागणी

(v) एक अधिक नगसंख्येच्या विक्रीनंतर एकूण प्राप्तीत झालेली निव्वळ वाढ म्हणजे ....

(अ) एकूण प्राप्ती (ब) सरासरी प्राप्ती

(क) सीमांत खर्च (ड) सीमांत प्राप्ती

प्र. २. **(अ)** खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून ती स्पष्ट करा (कोणतेही तीन) : (६) **[१२]**

(i) सफरचंदाची किंमत १०% नी कमी झाली असता विनयने सफरचंदाच्या मागणीत १०% नी वाढ केली.

(ii) रमाकांतने आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये ₹ ८०,००० उत्पन्न कर भरला.

(iii) माधुरीने ₹ १ लाखाची एकरकमी रक्कम ५ वर्षां करिता बँकेत ठेवली.

(iv) सुनिताला राज्यसरकारकडून दरमहा ₹ ३०,००० निवृत्तीवेतन मिळते.

(v) भारताने इराणकडून पेट्रोलियम पदार्थ खरेदी केले.

(ब) फरक स्पष्ट करा (कोणतेही तीन) : (६)

(i) इच्छा आणि मागणी

(ii) अंतर्गत व्यापार आणि आंतरराष्ट्रीय व्यापार

(iii) किंमत निर्देशांक आणि संख्यात्मक निर्देशांक

(iv) नाणेबाजार आणि भांडवल बाजार

(v) अल्पाधिकार आणि मक्तेदारी

प्र. ३. **खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही तीन) :** **[१२]**

(i) स्थूल अर्थशास्त्राची कोणतीही चार वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(ii) मागणीचे प्रकार स्पष्ट करा.

(iii) पुरवठ्याचे कोणतेही चार निर्धारक घटक स्पष्ट करा.

(iv) सार्वजनिक खर्चाचे वर्गीकरण स्पष्ट करा.

(v) निर्देशांकाच्या कोणत्याही चार मर्यादा स्पष्ट करा.

प्र. ४. खालील विधानांशी आपण सहमत आहात की नाही ते सकारण स्पष्ट करा (कोणतेही तीन) : **[१२]**

(i) असंख्य ग्राहक व असंख्य विक्रेते हे पूर्ण स्पर्धेचे एकमेव वैशिष्ट्य आहे.

(ii) भारतात नाणे बाजाराची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

(iii) 'आर्थिक कल्याणाचे सिद्धांत' याचा अभ्यास सूक्ष्म अर्थशास्त्रात केला जातो.

(iv) पुरवठ्याचा वक्र डावीकडून उजवीकडे वर जाणारा असतो.

(v) निर्देशांक हा मूळ वर्षाशिवाय तयार करता येतो.

प्र. ५. खालील तक्ता, आकृती, उतारा अभ्यासून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही दोन) : **[८]**

(i) (४)

पावती नं.-०५ दिनांक : १४.८.२०१८

टेबल क्रं.-०१ वेळ : १०.३० a.m.

कर्मचारी-अमित

अनु.क्र.	तपशील	संख्या	दर	रक्कम
(१)	रजिस्टर वही	०२	४२.००	८४.००
(२)	पेन	१०	०८.००	८०.००
(३)	पेन्सिल	१०	०४.४०	४४.००
(४)	रबर	१०	०४.४०	४४.००
(५)	स्केल (पट्टी)	०३	०८.००	२४.००
			एकूण	= २७६.००
			SGST ६%	= १६.५६
			CGST ६%	= १६.५६
			एकूण	= ३०९.१२

GST. No.27AAXPN3502E128

ग्राहकाची सही अधिकृत विक्रेता

प्रश्न :

(१) वस्तू व सेवा करांचे (tax) संक्षिप्त नाव लिहा. (१)

(२) वरील बिलात SGST आणि CGST किती टक्के (%) लावला आहे? (१)

(३) वरील बिलात पेनचा मूळ दर किती आहे? (१)

(४) विक्रेत्यांचा GST No. काय आहे? (१)

(ii) खालील आकृती अभ्यासून आकृतीच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा: (४)



प्रश्न :

(१) वरील आकृतीत 'क्ष' अक्षावर काय दर्शविले आहे? (१)

(२) कोणत्या किंमतीला मागणी व पुरवठ्याचा समतोल साधला आहे? (१)

(३) वरील आकृतीत 'य' अक्षावर काय दर्शविले आहे? (१)

(४) वरील आकृतीत मागणी व पुरवठ्याचा समतोल कोणत्या बिंदूने दर्शविला आहे? (१)

(iii) मागणीनुसार अर्थव्यवस्था (ऑन डिमांड इकॉनॉमी) : (४)

मागणीनुसार अर्थव्यवस्था म्हणजे डिजिटल मार्केट आणि तंत्रज्ञान कंपन्यांनी वस्तू आणि सेवांचे तात्काळ वितरण करून ग्राहकांची मागणी त्यांच्या इच्छेनुसार पूर्ण करण्यासाठी तयार केलेली आर्थिक क्रिया होय. मागणीनुसार अर्थव्यवस्थेला कधी कधी 'ऍक्सेस इकॉनॉमी' असे संबोधले जाते. कारण येथील कंपन्या बाजारात असणाऱ्या त्यांच्या साखळी दुकानांना आणि घाऊक व किरकोळ व्यापाऱ्यांना तसेच ग्राहकांना त्यांच्या सोईनुसार वस्तू व सेवा पुरवठ्याचे मार्ग निर्माण करतात.

ग्राहकांच्या सुविधेनुसार आणि या वस्तू व सेवांचा उत्तमप्रकारे सहज अनुभव मिळावा यासाठी सोयी, वेग आणि साधेपणा या सारख्या वैशिष्ट्यांना या कंपन्या प्राधान्यक्रम देतात तसेच ग्राहकांच्या मागणीनुसार व आवडी-

निवडीनुसार या कंपन्या वस्तू व सेवांचा पुरवठा करणे, त्या परत घेणे आणि वस्तू व सेवा लवकरात लवकर उपलब्ध करून देणे या सारखी विविध सुविधात्मक कामे करतात त्यामुळेच आज मागणीनुसार अर्थव्यवस्था अतुलनीय वेगाने वाढत आहे.

आजकल लोकांद्वारे सर्रासपणे उपयोगात आणलेल्या अनेक लोकप्रिय सेवा ऑन डिमांड अर्थव्यवस्थेची उदाहरणे आहेत. राईड शेअरिंग प्लॅटफॉर्म उबर आणि ओला, तसेच घरपोच किराणा पोचवणारे बिग बास्केट, डुन्झो, रिलायंस जिओ मार्ट हे अशा सेवा पुरवणाऱ्या अर्थव्यवस्थेची थोडी उदाहरणे आहेत.

प्रश्न :

(१) मागणीनुसार अर्थव्यवस्थेला काय म्हणतात? (१)

(२) मागणीनुसार अर्थव्यवस्थेची कोणतीही दोन उदाहरणे लिहा. (१)

(३) वरील उताऱ्याविषयी आपले मत लिहा. (२)

प्र. ६. सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन) : [१६]

(i) राष्ट्रीय उत्पन्न मापनाच्या कोणत्याही दोन पद्धती स्पष्ट करा.

(ii) घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत स्पष्ट करून गृहीतके स्पष्ट करा.

(iii) मागणीच्या किंमत लवचीकतेची संकल्पना स्पष्ट करून किंमत लवचीकतेचे प्रकार स्पष्ट करा.

◆◆◆